भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानूमान कृषि सल्ला पत्रक - सिंधूदुर्ग

## कालावधी (दिनांक ०८.०२.२०२० ते १२.०२.२०२०)

| अंक ११/२०२० | दिनांक ०७.०२.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०१/०२/२०२० ते ०७/०२/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानूमान (वैधता ०८/०२/२०२० ते १२/०२/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/०२ | ०२/०२ | ०३/०२ | ०४/०२ | ०५/०२ | ०६/०२ | ०७/०२ | दिनांक | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ | ११/०२ | १२/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.० | ३३.० | ३३.० | ३४.० | ३४.० | ३४.० | ३४.० | कमाल तापमान (अं. से) | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३५ |
| १५.५ | १५.५ | १५.० | १९.० | १८.० | १७.५ | १६.० | किमान तापमान (अं. से) | १८ | २० | २१ | २२ | २२ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | ४ | १ | ० | ३ | ४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ९४ | ९४ | ९२ | ९२ | ९० | ९० | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७५ | ८० | ८५ | ७३ | ६९ |
| ५४ | ४५ | ३६ | ४१ | ४१ | ४४ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४२ | ३४ | ३५ | ३८ | ३९ |
| १.६ | १.७ | १.८ | १.६ | १.५ | १.७ | १.७ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००६ | ००५ | ००५ | ००५ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | ईशान्ये कडून | पुर्वे कडून |
| पश्चिम | पश्चिम | ईशान्य | ईशान्य | ईशान्य | दक्षिण | - | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या आठवड्यात हवामान ऊष्ण व कोरडे त्याचबरोबर अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | फुटवे | भातावर पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस २ लिटर किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही ६२५ मिली किंवा लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही २५० मिली प्रति ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळुन एक हेक्टर क्षेत्रावरती फवारावे. |
| कुळीथ व चवळी | शेंगा | चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मि.ली. डायमिथोएट प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| कडवा वाल | शेंगा | वाल पिकास पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थांमध्ये जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे. पिकाला फुलो-यात असताना आणि दाणे भरण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. ज्यादा पाण्यामुळे वालाची शाखिय वाढ होते व उत्पन्न घटते.<br>पिक फुलो-यात आल्यावर शेंगा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| भुईमुग | फुलोरा | तापमान वाढीमुळे भुईमुग पीक फुलो-यात असताना तसेच शेंगा भरण्याच्या वेळेस पाण्याच्याअ २ पाळ्यांमधील अंतर सुमारे १२ ते २० दिवस असावे. |
| आंबा | फुलोरा ते फळधारणा | येत्या आठवड्यामध्ये तापामानात वाढ होण्याचा अंदाज असुन आंबा फळगळ नियंत्रणासाठी, ऊत्पन्न वाढविण्यासाठी व फळाची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराची असताना १% पोटॅशियम नायट्रेट्ची तीन वेळा फवारणी करावी.<br>विद्यापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होऊन चांगली फळधारणा होण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती १९ लि. पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सदर २५ लि द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे.<br>जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी येणा-या मोहोरावर फुलकीडीचा (थ्रिप्स) प्रादुर्भाव आढळुन आल्यास अशा ठिकाणी फुलकिडींच्या नियंत्रणासाठी ४५ % स्पीनोसॅड २.५ मिलि प्रति १० लिटर पाण्यातुन संपुर्ण झाडावर फवारावे. |
| काजु | फळधारणा | काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ % ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| मिरची | फुलोरा ते फळधारणा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. द्यावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| नारळ | फुलोरा | नारळावरील गेंड्या भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त माड साफ करुन सर्वात वरील पानांच्या बेचक्यात २% मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रम + ५० ग्रम वाळु याचे समप्रमाणात मिश्रण करुन भरावे. बागेमध्ये शेणखताच्या अळ्यांना मारण्यासाठी ५०% पा.मि. कार्बारिल भुकटी ४० ग्रम प्रती १० लि. पाण्यात मिसळुन फवारावी. |
| केळी | फुलोरा | केळीच्या पर्णगुच्छ रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त झाडे मुनव्यासकट समुळ जमिनीतुन उपटुन नष्ट करावीत. लागवडीसाठी रोगमुक्त मुनवे निवडावेत. मावा किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास डायमेथोएट १५ मिलि प्रती १० लि. पाण्यातुन १५ दिवसाच्या अंतराने तीन वेळा फवारावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)